# महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-३६अ२२/प्र.क्र.२०५/फ-१०

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १२.०८.२०२२

**प्रति,**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

**विषय: वनजमीन- गडचिरोली**
गडचिरोली-आलापल्ली-सिरोंचा, राष्ट्रीय महामार्ग क्र. ३५३ C या रस्त्याच्या कामासाठी ५४.६५ हे. वनजमीन वळतीकरणेबाबत.

**संदर्भ:** केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. डेस्क-१७/नोडल/गडचिरोली / आय. डी. १२९८७/८७४/२०२२-२३, दि.१२.०७.२०२२

गडचिरोली-आलापल्ली-सिरोंचा, राष्ट्रीय महामार्ग क्र. ३५३ C रस्त्याच्या गिताली ते झमेला नाला दरम्यानच्या कामासाठी ५४.६५ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. प्रकल्प चपराळा वन्यजीव अभयारण्यापासून ० कि.मी. अंतरावर असल्याचे प्रस्तावामध्ये नमूद आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रधान सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३.०८.२०२१ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती.

अशा परिस्थितीत वन्यजीव मंजूरी प्राप्त करण्याची आवश्यकता आहे किंवा कसे याची प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा मुख्य वन्यजीव रक्षक यांनी तपासणी करून त्यासंदर्भातील अहवाल शासनास सादर करण्याचे बैठकीत ठरले होते. तरी, सदर प्रकल्पासाठी वन्यजीव मंजूरीची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल शासनास तात्काळ सादर करण्यात यावा.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव:**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली